Filed Project

on

PROBLEMS OF CONSTRUCTION WORKERS IN ARVI CITY : A STUDY

Department Of Economics

Arts , Commerce and Science College , Arvi

Dist . Wardha २०२० – २१

Filed Project

on

PROBLEMS OF CONSTRUCTION WORKERS IN ARVI CITY : A STUDY

Students participated in this project work

1)Ishwar Mandwe

2) Dhiraj Tekade

3)Abhishek Mohod

4) Rutvik Kolhe

5)Mohannad Ahefaz

6) Riyaz Shaha

7) Aslam Khan Gaffar Khan

8) Jivan Bhoge

9) Ku. Astha Gupta

10) Ku Ratuja Kondekar

11) Mayari Kathalkar

12)sneha Walivkar

13)Bhavika Khekar

4)Pallavi Gohate

15)Rajani Uikey

Dr . H . D . Choudhari

Department Of Economics

Dr . H . R. Verulkar

Principal

Arts , commerce and science college , Arvi , Dist Wardha

२०२०-२०२१

प्रतिज्ञापत्र

'आर्वी शहरातील बांधकाम मजुरांच्य समस्या : एक अध्ययन ' या विषयावर संशोधन प्रकल्प सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे. संशोधनाचे कार्य पुर्ण करण्याकरीता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वेरुळकर सर यांनी वेळोवेळी प्रोत्साहीत केले आणि आवश्यक ती मदत केली, याबद्दल त्यांचे आभार

संशोधनासाठी आवश्यक माहीती उपलब्ध भरुन देणारे अर्थशास्त्र विषयाचे बी.ए अंतीम वर्षाचे विद्यार्थी आणि मुलाखत अनुसूची भरुन देण्यात ज्या बांधकाम कामगारांनी मोलाची मदत केली, सहकार्य केले त्या सर्वांचे आभार मानतो. या संशोधनासाठी प्रत्यक्ष - अप्रत्यक्षपणे ज्यांचे सहकार्य लाभले त्या सर्वांचे आभार.

प्रा . हेमराज चौधरी
(अर्थशास्त्र विभाग)
कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
आर्वी , जिल्हा . वर्धा

अनुक्रमाणिका

प्रकरण	शिर्षक	पृष्ठ क्र .
१ .	प्रस्तावना	१-४
२.	साहित्याचे पुर्वावलेकन	५
३.	संशोधन पद्धती	६-१२
४.	आर्वी शहराचा इतिहास	१३-१५
५.	माहीतीचे विवेचन व विश्लेषण	१६-२४
६.	निष्कर्ष, उपाययोजना, संदर्भसुची	२५-३१
७.	संदर्भसुची	३२-३३
८.	मुलाखात अनुसुची	३४-३५

प्रकरण पहिले

१.१ प्रस्तावना

बांधकाम उद्योग हा भारताच्या स्थुल देशांतर्गत उत्पादनात ११ % इतका योगदान देणारा एक महत्वाचा उद्योग आहे. कृषीक्षेत्रानंतर सर्वात जास्त रोजगार पूरवीणारा उद्योग म्हणून बांधकाम उद्योगाची ओळख आहे. सध्या सर्वसाधरणपणे ३५ दशलक्ष पेक्षाही जास्त लोक व्यवसाय़ात गुंतलेले आहेत. बांधकाम उद्योग अनेक उद्योगांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष चालना देत असतो. उदा. सिमेंट लोहपोलाद , इलेक्ट्रिक साहित्य, फर्निचर, वीटभट्टी इत्यादी.

अलिकडील काळात सरकारने बांधकाम उद्योगास चालणा देणारी अनेक पावले उचलली आहेत. त्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना असून या योजने अंतर्गत शहरी भागासाठी २०२२ पर्यंत २० दशलक्ष घरे बांधून देणे किंवा घरांऩा अर्थसहाय करणे, अनुदान देणे इत्यादी उद्दिष्ट्ये आहेत. तसेच सरकार पायाभूत सुविधांचेही अनेक प्रकल्प राबवीत आहे. मार्च २०१७ मध्ये केंद्र सरकारने केलेला रेश कायदा, या सर्वांचा परिणाम म्हणून लहान व मोठ्या शहरांचा विस्तार वेगाने होत आहे. त्यामुळे बांधकाम उद्योगास अधिकाअधिक बळकुटी मिळत आहे.

जलद गतीने वाढणाऱ्या बांधकाम उद्योगात मोठ्या प्रमाणात कामगाराची गरज निर्माण होत आहे. भारतातील वाढल्या दुष्काळी परिस्थीतीत शेतीक्षेत्रामधील अरिष्ट, ग्रामीण भागातील रोजगार निर्मीतीचा अभाव याचा परिणाम म्हणुन शहरी भागात बांधकाम उद्योगात अनेक मजूर स्थलांतरन करीत आहे. स्थलातरित मजुरांध्ये कुशल मजुरांपेक्षा अकुशल मजुरांचा समावेश सर्वाधिक आहे.

गेल्या काही वर्षात भारतातील अनेक लहानमोठी शहरे ही बांधकाम मजुरांच्या भरतीची केंद्रे झाली आहेत. बांधकाम मजुरांचे अल्पशिक्षण, स्थलांतरण, कमी कौशल्य किंवा कौशल्याचा अभाव

यामुळे ते शोषणाचे बळी ठरतात. कामाचे जास्त तास, अपुरे वेतन, व्यसनाधिनता यामुळे त्यांची स्थिती दयनीय राहते. त्यांना बांधकाम व्यवसायात काम केल्यामुळे अनेक शारीरिक आजारांना तोंड द्यावे लागते. मिळालेल्या उत्पनातील बराचसा हिस्सा औषधोपचारावर खर्च होतो. जे दुसऱ्यांसाठी भक्कम निवारा बांधतात अशा बांधकाम मजुरांच्या निवाऱ्याची स्थिती दयनीय असते हीच बांधकाम मजुरांची मोठी शोकांतिका आहे.

श्रमीकांच्या प्रत्येक वर्गाची आपली समल्या आहे त्या समस्यांचे व्यापकरुपात विश्लेषण करणे आवश्यक आहे, कारण त्याचा संबंध श्रमिंकांच्या काम करण्याच्या ठिकाणापासूनंतर घर व समाजापर्यंत आहे. काम करण्याच्या ठिकाणी श्रमिकांची सुरक्षितता, त्याचे स्वास्थ व उत्पादकता, घरी त्यांच्या परिवारासाठी शिक्षण, मनोरंजन, सामाजिक जीवन व सुरक्षा यासर्व गोष्टीकंडे व्यापक दृष्टीकोनातून पाहणे आवश्यक ठरते. याच अनुषंगाने भारत सरकार तसेच राज्यसरकारांनी कामगाराविषयी अनेक कायदे केले आहेत.

१) The buliding and other construcation worker's (Rgulation of employment and conditions of service) Act १९९६

२) The buliding and other construcation worker's welfare cess Act - १९९६

३) The buliding and other construcation worker's welfare rules, १९९८

४) The buliding and other costrucation worker's (Regulation of employment and conditions of service) central rules, १९९८

५) The maharashtra building and other construcation workers (Regulation of employment and conditions of service) central rules, २००७

अशाप्रकारचे अनेक कायदे बांधकाम मजुरांच्या कल्याणासाठी सरकारने तयार केले आहेत. तरीही आज देखील अनेक प्रकारच्या समस्यांना बांधकाम मजूर तोंड देताना दिसत आहे. मजुरीच्या हंगामी स्वरुपापासून ते मधल्या काळातील विश्रांतीच्या अभावापर्यंतच्या अनेक समस्या त्यांच्यासमोर आहेत. संशोधनासाठी निवडलेल्या आर्वी शहराचा विचार केला तर असे दिसून येते की, निम्न वर्धा धरण प्रकल्पामूळे अनेक गावे विस्थापित झालेत, त्यातील बहुतांश गावांचे पुनर्वसन आर्वी शहराला लागून उपलब्ध असलेल्या जागेवर झाले आहे. या शेतकऱ्यांच्या जमीनी धरणात गेल्यामुळे त्यांचा रोजगार गेल्या शिवाया औद्योगिकरणाचा पुरेसा विस्तार या भागात न झाल्यामुळे अनेक लोकांना उपजिवीकेसाठी बांधकाम व्यवसायाची निवड करावी लागली. या व्यवसायात गवंडी, टाईल बसवीणारे, सुतार, फेब्रिकेटर, इंटेरिअर डिझायनर, नळकारागीर, वीजतंत्री, मदतनीस यासारख्या लोकांना रोजगार मिळू लागला. वर्तमानकाळात सरकारच्या घरकूल योजनेममुळे आणि पुनर्वसित गावांमधील घरांची बांधकामे मोठया प्रमाणात निर्माण होत आहे. त्यामुळे अनेक लोकांना या क्षेत्रात रोजगार मिळत आहे, त्याशिवाय या व्यवसायात कौशल्याची फारशी गरज नसते, त्यामुळे सहजपणे काम उपलब्ध होते. वर्तमानकाळात या व्यवसायातील मजुरांची संख्या वाढल्याने त्यांच्या कामगार संघटना देखील उदयास आलेल्या दिसतात. शिवाय सरकारने देखील बांधकाम व्यवसायात काम करणाऱ्या मजुरांसाठी अनेक सरकारी योजना सुरु केल्या आहेत, तरी देखील या व्यवसायातील कामगारांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, त्यांच्या समस्यांचा अभ्यास करण्याच्या दूष्टीकोणातून कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्याल्य, आर्वी अंतर्गत अर्थशास्त्र विभागादवारे प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

संशोधनाचा विषय

प्रस्तुत संशोधनाचा विषय हा वर्धा जिल्हयातील आर्वी शहरातील बांधकाम मजूरांच्या समस्या एक अध्ययन हा आहे. वर्तमानकाळात कृषीउत्पादनातील अनीयमीततेमुळे व औद्योगिकरणाच्या पुरेशा अभावामूळे रोजगारीच्या संधी फारशा उपलब्ध होताना दिसत नाही. परंतु प्रत्येकास आपल्या स्वतःचा निवारा असावा असे वाटते, त्यामूळे घरबांधणीच्या कामात रोजगार उपलब्ध होताना दिसत आहे. त्याच अनुषंगानि या क्षेत्रात अनेक मजूर काम करताना दिसतात पर्यायाने या मजुरांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत विषय निवडला आहे.

विषयनिवडीची आवश्यकता

रोजगारसंधी उपलब्ध करुन देणाऱ्या उद्योगांपैकी बांधकाम व्यवसाय हे महत्वाचे क्षेत्र आहे. या व्यवसायाशी संबंधीत गवंडी, नळकारागीर, इलेक्ट्रिक चे कार्य करणारे, टाईल्स बसवीणारे, पेंटर, सुतार, मदतनीस या सर्वांचा या क्षेत्राशी जवळचा संबंध आहे. त्यामुळे त्यांच्या समस्या जाणून घेणे आवश्यक वाटल्याने प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आली.

प्रकरण दुसरे

साहित्याचे पुर्वावलोकन

सदर संशोधनासाठी काही साहित्याच्या पुनरावलोकनाचा प्रयत्न केला आहे. अरुणा साळोखे आणि किर्ती झनकारी (२०१५) यांनी सुरत शहरातील स्थलांतरित असंघटीत क्षेत्रातील बांधकाम मजूरांच्या सामाजिक व आर्चिक स्थितीचा अभ्यास केला. त्यांच्या अभ्यासानुसार बांधकाम मजूर हे असंघटीत असून अनेक जिल्हयांमधून व राज्यांमधून स्थानांतरण करुन आले आहेत व त्यांची आर्थिक स्थिती दयनीय आहे. लेबर ब्युरो चंदीगड(२०१४) यांच्या महिला कामगारांच्या सांख्यिकी अहवाल २०१२-१३ नुसार महिला कामगारांची आर्थिक स्थिती दयनीच आहे , तसेच त्यांना सारख्याच कामासाठी पुरुषांपेक्षा कमी मजुरी दिली जाते. पी. साईनाथ यांच्या मते, दुष्काळी परिस्थितीमूळे ग्रामीण भागातील अनेक मजूर काम मिळवीण्यासाठी शहरात जावून बांधकाम क्षेत्रात मजूरी करीत आहेत , तसेच त्यांचे आर्थिक उत्पन्नही अल्प आहे. एम. किर्तने आणि डॉ. जे. गुडवीन प्रेमसिंग (२०१४) यांच्या संशोधन निबंधात त्यांनी बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक महिला अशिक्षित असतात, असे नमूद केले आहे. त्यांना कामाचे जास्त तास असतात, पण वेतन मात्र कमी असते, त्यांचे शोषणही होत असते, असे नोंदवीले आहे. याशिवाय प्रा. चंद्रकात जाधव यांचे कोल्हापुर शहरातील बांधकाम कामगारांचा एक अभ्यास याविषयावर संशोधनपर लेखन झालेले आहेत.

अशाप्रकारे अनेक अभ्यासकांनी बांधकाम मजूरांच्या तसेच काही महिला बांधकाम मजुरांच्या आर्थिक, सामाजिक स्थितीचा अभ्यास केला आहे. सदरच्या लघुशोधप्रबंधात इमारत बांधकाम अगर इतर बांधकाम मजुरांच्या आर्थिक, सामाजिक तसेच त्यांना भेडसावणाचा समस्यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर बांधकाम मजुरांच्या समस्यांवर उपाययोजना सुचवीण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रकरण तिसरे

संशोधनपद्धती

आधुनिक युग हे संशोधनाचे युग म्हणून ओळखले जाते. नवीन ज्ञान मिळवीण्याच्या उद्देशाने करण्यात येणाऱ्या व्यवस्थित प्रयत्नाला संशोधन असे म्हणतात. आज विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे समाजजीवनावर त्याचा अनेक प्रकारे प्रभाव पडताना दिसून येत आहे. त्यामूळे सामाजिक परिवर्तन होवून समाजात अनेक बदल घडून येताना दिसत आहे. बदलत्या काळानुसार नवीन तत्वे व नवीन विचार समोर येताना दिसत आहे. यातून अनेक समस्या निर्माण होत आहे. त्या समस्या रतोडवीण्यासाठी व त्यावर उपाययोजना सुचवीण्यासाठी संशोधनाची गरज निर्माण होत आहे.

३.१ संशोधनाची व्याखा

कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तत्वे व तथ्ये यांच्या परिक्षणासाठी केलेला अभ्यास म्हणजे संशोधन अशी सर्व सामान्य संशोधनाची व्याख्या केली जाते.

मोझर यांच्या मते सामाजिक घटना व सामाजिक समस्याच्या बाबतीत नवीन ज्ञान प्राप्त करुन घेण्याच्या उद्देशाने केलेले क्रमबध्द प्रयत्न म्हणजे संशोधन होय.

लेहमन आणि गोटी यांच्या मते, संशोधन म्हणजे नवीन ज्ञान संपादनासाठी केलेला पद्धतशीर प्रयत्न होय.

थोडक्यात संशोधन ही एक पद्धतशीर व वैज्ञानिक प्रक्रिया असून त्याद्वारे सामाजिक जीवना संबंधी नवीन तथ्याचा शोध घेतला जातो किंवा जुन्या तथ्यांचे पुन : स्पष्टीकरण केले जाते.

३.२ विषयाची निवड

प्रस्तुत संशोधनासाठी आर्वी शहरातील बांधकाम मजुरांच्या समस्या : एक अध्ययन या विषयाची निवड केली आहे .

रोजगार संधी उपल्ब्ध करुन देणाऱ्या अनेक उद्योगापैकी बांधकाम उद्योग हा महत्वाचा उद्योग आहे. इतरत्र रोजगार संधी उपल्ब्ध नसल्याने या व्यवसायाकडे लोकांचा कल आहे. परंतु असंघटीतपणामुळे आणि इतर अनेक कारणामुळे या व्यवसायात काम करणाऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते, या दूष्टीकोनातून त्यांच्या समस्यांचा अभ्यासा करुन त्यावर उपाययोजना सुचवीण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

३.३ सामाजिक संशोधनाचा हेतू

समाजामध्ये निर्माण होणाऱ्य समस्या जाणून घेणे आणि त्यावर उपाययोजना सुचवीणे हा सामाजिक संशोधनाचा हेतू असतो . सैदूधांतिक संशोधन हे मूलभूत स्वरुपाचे असते. या संशोधनात एखादया समस्येचे मुलभूत कारण शोधण्याचा प्रयत्न केला जातो. व्यावहारिक संशोधनाचा मुख्य उद्देश संपादीत ज्ञानाचा सामाजिक कल्याणासाठी उपयोग करणे हा उद्देश असतो. समस्या निर्माण झाल्यावर त्यावर उपाययोजना सूचवीणे यावर या पद्धतीत भर दिला जातो.

३.४ संशोधनाची उद्दीष्टये

प्रस्तुत संशोधनाची खालीलप्रमाणे उद्दीष्टये निश्चित केली आहे.

- बांधकाम मजुरांच्या आर्थिक समस्या जाणून घेणे
- आरोग्यविषयक समस्या जाणून घेणे
- कोरोना काळातील लॉकडाउनमुळे मजुरांवर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे
- बांधकाम मजुरांच्या समस्यांवर उपाययोजना सूचवीणे

३.५ संशोधनाची गृहीतकृत्ये / उपकल्पना

संशोधन समस्येबाबत काही प्राथमीक स्वरुपाचे ज्ञान संशोधकाला असते या ज्ञानाच्या आधारावर संशोधक काही विधाने मांडतो, त्यालाच गृहीतक असे म्हणतात. या गृहीतकामुळे संशोधनकार्याला निश्चित दिशा प्राप्त होते.

डॉ . गंगाधर कायदे पाटील यांच्या मते, ज्या विधानामुळे संशोधनाची उद्दीष्टये, हेतू साध्य होण्यात मदत होते, अशा विधानास उपकल्पना असे म्हणतात. हे विधान कामचलाऊ स्वरुपातील संशोधकाचे अनुमान असते.

थोडक्यात गृहीतकृत्य किंवा उपकल्पना म्हणजे प्रारंभिक किंवा प्राथमीक स्वरुपाचा विचार होय .

प्रस्तुत संशोधनाकरीता खालील गृहीतकृत्ये मांडण्यात आली आहे.

- बांधकाम मजुरांच्या आरोग्यविषयक समस्या आहे
- आर्थिक दृष्टया बांधकाम मजूर कमकुवत आहे.
- कोरोना काळातील लॉकडाउनमुळे त्यांची आर्थिक स्थिती खालवली आहे.

३.६ संशोधन आराखडा

संशोधनात योग्य दिशा आणि गती देण्यासाठी संशोधन आराखडा तयार केला जातो. संशोधन शास्त्रीय पद्धतीचे पूर्ण करण्यासाठी आणि संशोधनाचे निष्कर्ष संशोधनाच्या चौकटीत राहण्यासाठी संशोधकाने संशोधनकार्य सुरु करण्यापुर्वी तयार केलेली रुपरेषा म्हणजे संशोधनाचा आराखडा होय. त्यामध्ये समस्या प्रस्तावना, संशोधनाची उद्दीष्टये, संशोधनाची गृहीतकृत्ये, संशोधनाची पद्धती, माहीतीचे संकलन व विश्लेषण पद्धती, प्रकरण स्पना इ. चा विचार करावा

लागतो. थोडक्यात संशोधनाच्या संदर्भातील कार्ययोजना म्हणजे संशोधन आराखडा होय. संशोधन आराखडयामुळे संशोधनात सुसुत्रता येते आणि संशोधन प्रक्रियेस गती प्राप्त होते. संभाव्य अडचणींचा अंदाज येतो, त्यामुळे वेळ, पैसा आणि शक्ती यांचा अपव्यय टाळता येतो.

३.७ तथ्य संकलन

सामाजिक संशोधन करताना वैज्ञानीक पद्धतीचा अवलंब केला जातो. वैज्ञानिक पद्धतीचे उद्दीष्ट घटनेच्या बाबतीतील सत्य शोधून काढणे हे असते. तथ्यप्राप्तीचा खरा आधार आपली ज्ञानेंद्रिये हा आहे. ज्ञानेंद्रियाच्या आधारे होणारा स्थितीबोध किंवा निरीक्षण म्हणजे तध्य होय, असा तथ्याचा सर्वसाधारण अर्थ घेता येतो.

श्री फेअर चाईल्ड यांच्या मते, तथ्ये म्हणजे अशी घटना की जिचे अवलोकन व मापन याबाबतीत सर्वाचे सहमत होते.

श्री गुड आणि हॅट यांच्या मते, तथ्ये म्हणजे एक अनुभावसिद्ध सत्यापनीय अवलोकन होय.

प्रस्तुत संधोनसाठी प्राथमीक व व्दितीयक तथ्य संकलन या दोन पद्धतीचा वापर करण्यात आला.

प्राथमीक तथ्य संकलन - संशोधनासाठी लागणारी माहीती संबंधीत व्यक्तीच्या मुलाखती घेवून प्रश्नावलीच्या स्वरुपात प्राप्त केली जाते, तेव्हा त्याला प्राथमिक स्त्रोतांद्ववारे माहीती संकलन असे म्हणतात. प्रस्तुत संशोधनासाठी मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात आला. बांधकाम मजूर व कामगार संघटनेचे प्रमुख यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करुन माहीती मिळवीण्यात आली.

व्दितीयक तथ्य संकलन - यामध्ये प्रकाशीत साहित्य, लेख, अहवाल, यांचा आधार घेवून तथ्य संकलीत करण्यात आले.

३.८ नमुना निवड

समुहाच्या सर्व सदस्यांशी संपर्क प्रस्थापित करुन माहीती गोळा करण्याच्या पद्धतीला जणगणना पद्धती असे म्हणतात, ही पद्धती समुह लहान असेल तरच शक्य असते. याउलट समुहातील प्रातिनिधी सदस्य निवडून त्यांच्याकडून माहीती मिळवीणे व ती माहीती संपुर्ण समुहाची आहे असे मानणे, या पद्धतीला नमूना म्हणतात. यामुळे माहीती लवकर व कमी खर्चात गोळा करता येते. दैनंदीन व्यवहारात सुद्धा ही पद्धती वापरली जाते.

प्रस्तुत संशोधनासाठी आर्वी शहरात असलेल्या कामगार संघटनांच्या तीन कार्यालयातून माहीती मिळवीण्याचा प्रयत्न केला, परंतु माहीती देण्यास टाळाटाळ करण्यात आली. त्यामुळे या व्यवसायाशी संबंधीत गवंडी, सेंट्रीग कामगार फरशी बसवीणारा, सुतार, फेब्रीकेटरचे काम करणारा, नळकारागीर, वीजतंत्री, इंटेरिअर डिझायनर कामगार, पेंटर व मदतनीस यांची हेतूपुर्वक नमुना निवड केली. कारण एकून कामगार संख्येची अचूक माहीती न मिळाल्यामुळे हेतूभिमुख नमुना निवड केली आहे.

खालील तक्यात संशोधन अभ्यासाच्या नमुना आकाराची निवड दर्शवीली आहे.

अ.क्र.	कामगारांचा प्रकार	वारंवारीता
1	गवंडी	०५
2	सेंट्रिंग कामगार	०५
3	नळकारागीर	०५
4	फरशी बसवीणारा	०५
5	सुतार	०५
6	फेब्रीकेटर	०५
7	वीजतंत्री	०५
8	इंटेरियर डिझायनर	०५
9	पेंटर	०५
10	मदतनीस / बिगारी	०५

वरील सारणीमध्ये दहाप्रकारचे बांधकाम कामगार दर्शवीले आहेत आणि हे सर्व कामगार इमारत व रस्ते बांधकामात महत्वाची भुमिका बजावत आहे.

३.९ संशोधनविषयाचे शिर्षक आर्वी शहरातील बांधकाम मजूरांचा समस्या : एक अध्ययन

३.१० संशोधनाचे क्षेत्र :

वस्तूनिष्ठ संशोधनाकरीता वर्धा जिल्हयातील आर्वी शहरापुरते संशोधनाचे क्षेत्र मर्यादीत ठेवण्यात आले आहे.

३.११ प्रकरणांची रचना :

प्रकरण- १ - प्रस्तावना

प्रकरण- २ - साहित्याचे पुर्वावलोकन

प्रकरण- ३ - संशोधनपद्धती

प्रकरण- ४ - आर्वी शहराचा इतिहास

प्रकरण- ५ - माहितीचे विवेचन व विश्लेषण

प्रकरण- ६ - निष्कर्ष व उपाययोजना

३.१२ संशोधन मर्यादा :

सामाजिक शास्त्राला येणाऱ्या सर्व मर्यादा प्रस्तूत अध्ययनाला लागू राहतील. मुलाखत अनुसूची या साधनाचा वापर करुन माहीती गोळा करण्यात आली. त्यामुळे नमुना निवड पद्धतीला येणाऱ्या मर्यादा प्रस्तूत अध्ययनाला लागू राहतील. शिवाय संशोधन विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात असल्यामुळे आर्थिक सामाजिक स्थितीच्या मर्यादा संशोधनाला लागू राहतील.

३.१३ संशोधनाचे महत्व :

प्रस्तुत संशोधनाचे महत्व व्यक्तिगत अध्ययनाच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन तर महत्वपुर्ण आहेच याशिवाय सरकारी व गैरसरकारी संस्था उदा आरोग्य व्यवस्था, कामगार संघटना, श्रम मंत्रालय यांच्या दृष्टीने सुद्धा उपयोगी राहील. संशोधनाद्वारे सुचवीलेल्या उपाययोजनांची योग्य अमबंलबजावणी केली जावून कामगारांचे आरोग्य सुधारण्यात त्याचा फायदा होईल.

३.१४ संशोधनाचा कालावधी

प्रस्तुत संशोधनासाठी जून २०२० ते जून २०२१ हा एक वर्षाचा कालावधी घेतला आहे .

प्रकरण चौथे

आर्वी शहराचा इतिहास

संतांची भूमी म्हणून ओळख असणारे आर्वी शहर हे वर्धा जिल्ह्यातील तालुक्याचे प्रमुख ठिकान आहे. संत मायाबाई, संत पांडुरंग महाराज, संत लहानुजी महाराज (टाकरखेड) या प्रमुख संतांचे अनेक भक्त विदर्भात पसरलेले आहे यशियाय संत निर्मलाबाई जोशी, आडकुजी महाराज, तात्याजी महाराज, बाबा महाराज आर्वीकर यांचे आर्वीशी अतूट नाते आहे. संत भानुदास महाराज यांनी अंध मुलांसाठी वर्धमनेरी येथे विद्यालय सुदधा सुरु केले आहेत.या परिसरातून भारतीय स्वतंत्र्यलढ्यात अनेक स्वतंत्य सैनिकानी तुकडोजी महाराजासोबत सहभाग घेऊन, प्रेरणादायी भाषणे देवून जनतेम्ध्ये स्वातंत्र्यासाठी जाणीवजागृती निर्माण केली आहेत.

प्राचीन काळापासून आर्वी हे कापसाचे प्रमुख उत्पादन केंद्र म्हणून प्रसिद आहे. पुलगांव रेल्वे स्टेशनपासून ३५ लिलोमीटर आणि नागपुर विमानतळापासून ११० किलोमीटर अंतरावर हे शहर बसलेले असून वर्धा नदी आणि बाळकी नदी आर्वी तालुक्याच्या सीमेवरून वाहत आहे. २०११ च्या जणगणनेनुसार आर्वीची लोकसख्या जवळपास ४३,००० सागितली जाते. य शहरात विविध जाती धर्माचे अनेक गुण्या गोविंदाने शहरात असून सामाजिक एकोपा हे येथील विशेष आहे. साक्षरता दर ९०.६% आहे. कुषक शिक्षण संस्था आणि भारत शिक्षण संस्थेच्या शाळांचे जाळे संम्पूर्ण परिसरात पसरलेले आहे. सोबतच नगरपालिकेचे गांधी विद्यालय, ज़िल्हापरिषद कन्या विद्यालय, कन्नमवार विद्यालय, तपस्या पब्लिक स्कूल, विधानिकेतन आणि मॉउंट कार्मेल या इंग्रजी शाळा दर्जदार शिक्षण उपलब्ध करून देत आहे. इग्रजांचा काळापासून अस्तित्वान असलेल्या लोकमान्य वाचनलयात १ लाख पुस्तकें आहेत.

आर्वी हे ब्रिटिशकालींन रेल्वे शकुंतला एक्सप्रेस साठी सुद्धा विशेषत्त्वाने ओळखले जाते, जि भारतात बऱ्याच काळापासून अतित्वात असलेली नॅरोगेज रेल्वे म्हणुन प्रसिद्धध आहे. या रेल्वेचा वापर या भागातील कापूस इंग्लड़मधील मँचेस्टर येथे नेण्यासाठी केला जात होता.

ब्रिटिशानी १९०७ मध्ये बांधलेला सारंगपुरी तलाव जो संपूर्ण आर्वी शहराला मोटरपंपशिवाय गुरुत्वीय दाबाच्या तंत्राद्वारे पाणीपुरवठा करते त्यांचे विशेष महत्व आहे. ते उद्यान म्हणून प्रसिद्दधिस येत असून हजारो पक्षी आणि प्राणी येथे वास्तव्यास असतात. सध्या आर्वी शहराला पाणीपुरठ्याची पर्यायी व्यवस्था म्हणून कोडण्यपूर येथून वर्धा नदीच्या पात्रातून पाण्याचा पुरवठा केला जातो.

आर्वी पासुन १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या कोंडण्यपूर चा उल्लेख महाभारतात रुख्मिणीचे हरण या प्रसंगात आला आहे. श्रीकृष्णाने जिथून रुख्मिणी हरणं केले ते अंबिका मंदिर ते अंबिका मंदिर कोंडण्यपूर येथे स्थित आहे, जेथे नवरात्र ला मोठा उत्सव साजरा केला जातो. कोंडण्यपूरहे महाभारत कालीन विदर्भ प्रातांची राजधानी होती. नलराजाची पत्नी दमयंती सुध्दा कोंडण्यपूरची होती असा उल्लेख पुराणामध्ये आढळतो. त्यामुळेच वर्धा नदीवर बांधण्यात आलेल्या अप्पर वर्धा धरणाला नलदमयंती सरोवर असे नाव देण्यात आले आहे. याशिवाय विदर्भाचे पंढरपूर असा विशेष लौकिक कोंडण्यपूरला प्राप्त झाला आहे. वर्धा नदी काठावरील विठ्ठल मंदिरात दर्शनासाठी कार्तिक आणि आषाढी एकादशी संपूर्ण विदर्भ प्रांतातून भाविक येत असतात. याप्रसंगी जत्रेचे आयोजन सुद्धा केले जात असते.

Red cross society, Rotary and Lions Club, मदत फाउंडेशन, प्राणीमित्र आणि पर्यावर्ण बचाव समिती आणि इतर सामाजिक संघटना यांचे अस्तित्व आणि महत्व आर्वी शहरात विशेषतत्वाने आहे. या संघटना सामाजिक, सांस्कृतिक व आरोग्यविषयक कार्यासाठी सदयव तत्पर असतात. आर्वीतील तेलंगराय महाराजचे समाधी स्थळ हे हिंदू -मुस्लिम ऐक्याचे प्रतीक आहे. ३०० वर्षांपूर्वीचे कचवाला दिगांबर जैन मंदिर विशेष प्रसिद्ध आहे. नवीन बांधण्यात आलेले श्वेतांबर

जैन मंदिर हे कलाकृतीचा उत्कृष्ट नमुना आहे. घोडा मंदिर सुधा आकर्षणाचे केंद्र आहे. आर्वी नगरपरिषद आणि लोकमान्य वाचनालय यांची स्थापना १८६५ ला झाली असून गांधी विधालय, ब्रिटिश पार्क हे ब्रिटिश कालीन स्थापना शास्त्राचे उत्तम नमुने आहेत.

प्रकरण पाचवे

माहीतीचे विवेचन व विश्लेषण

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन पूर्तीसाठी संकलीत केलेल्या माहीतीचे सांख्यिकीय विश्लेषण आणि विवेचन करण्यात आले आहे. आवश्यक तेथे आलेख काढण्यात आले आहे.

बांधकाम व्यवसाय क्षेत्र हे मोठे क्षेत्र आहे यात काम करणारे व्यक्ती हे इमारत बांधकाम, रस्ते व वाहतूक मार्ग बांधकाम धरण व बंधाऱ्याचे काम करणारे कामगार, नालीचे बांधकम करणारे कामगार अशा अनेक व्यवसायात विभाजीत झालेले आहे. प्रस्तुत अध्ययनासाठी इमारत बांधकाम व्यवसायात गुंतलेल्या मजुरांचा विचार करण्यात आला. आर्वी शहराचा विचार करता हे ठिकाण तालुकास्तरिय आहे आणि नगरपालिका क्षेत्र असल्यामुळे येथे मोठया महानगरपालिका क्षेत्रांमध्ये जसे फ्लॅटचे बांधकाम चालतात तसे होत नाही, तर जास्तीत जास्त दोन मजल्यापर्यतचे बांधकाम होत असते. मात्र निम्न वर्धा प्रकल्पामुळे अनेक गावे विस्थापीत होवून आर्वी शहराच्या आजूबाजूला त्यांचे पुनर्वसन अजूनही सुरु आहे, शिवाय सरकारी घरकुल योजनेमुळे देखील येथील बांधकाम व्यवसाय हा वाढीला लागलेला आहे. त्याच अनुषंगाने प्रस्तुत विषय अध्ययनासाठी निवडलेला आहे. बांधकाम मजुरांमध्ये गवंडी, नळकारागीर, वीजतंत्री, फरशी बसवीणारा, सुतार, इंटेरिअर डिझायनर (पीओपी), सेंट्रीग कामगार, फेब्रीकेटर, पेंटर व मदतनीस या कामगारांच्या समावेश होतो. प्रत्येक प्रकारातील ०५ कामगारांकडून मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून माहीती मिळवीण्यात आली आहे. अशा प्रकारे १० प्रकारातील प्रत्येकी ०५ अशा एकूण ५० कामगारांचे अध्ययन केले आहे.

उत्तरदात्यांची वैयाक्तीक माहीती

सारणी क्र . ५.१

वयोगटानुसार आरदात्यांचे वर्गीकरण

वयोगट	वारंवारिता	टक्केवारी
१८ ते २५ वर्षे	१०	२०%
२६ ते ३५ वषै	२०	४०%
३६ ते ४५ वषै	१५	३०%
४६ पेक्षा अधिक	०५	१०%
एकूण	५०	१००%

वरील सारणीवदन असे निदर्शनास येते की ४६ पेक्षा अधिक वय असणाऱ्या कामगारांचे प्रमाण सर्वात कमी तर २६ तें ३५ या वयोगटातील कामगारांचे संख्या सर्वाधिक आहे.

सारणी क्र ५.२

शैक्षणिक पात्रतर दर्शवीणारी सारणी

शिक्षण	वारंवारीता	टक्केवारी
प्राथमिक	०७	१४%
माध्यमिक	१५	३०%
पदवी व पदव्युतर	१६	३२%
अशिक्षीत	१२	२४%
एकूण	५०	१००%

वरील सारणीनुसार माध्यमिक व पदवी शिक्षण घेतलेल्यांचे प्रमाण अधिक आहे. विशेषत : वीजतंत्री, नळकारागीर, पेंटर, फेब्रीकेटर या प्रकारांमधील शिक्षण घेतलेल्या मजुरांचे प्रमाण अधिक आहे.

सारणी क्र . ५.३

जातीचा प्रवर्ग दर्शवीणारी सारणी

जातीची वर्गवारी	वारंवारीता	टक्केवारी
ओ. बी. सी	१५	३०%
एस. सी.	१२	२४%
एस. टी	१३	२६%
N. T. व इतर	१०	२०%
एकूण	५०	१००%

वरील सारणीनुसार ओ.बी. जी. प्रवर्गातील मजूर जास्त असले तरी त्यात सुतार, वीजतंत्री, नळकारागीर, पेंटर यांचा अधिक समावेश आहे, त्यामानाने इतर प्रवर्गातील एकूण संख्या सर्वातील आहे.

सारणी क्र . ५.४

वैवाहि दर्शविणारी सारणी

वैवाहिक दर्जा	वारंवारिता	टक्केवारी
विवाहीत	३०	६०%
अविवाहीत	१५	३०%
घटस्फोटित	०२	०४%
विधवा / विदूर	०३	०६%
एकूण	५०	१००%

वरील सारणीवरुन दिसून येते की विवाहीत मजुरांची संख्या जास्त आहे .

सारणी क्र . ५.५

<u>कामाचे स्वरूप दर्शवीणारी सारणी</u>

कामाचे स्वरुप	होय	नाही	एकुण
हंगामी	३६ (७२%)	१४ (२८%)	५० (१००%)

कामाचे स्वरूप हंगामी असते काय ? असा प्रश्न विचारला असता ३६ उत्तरदात्यांनी होय असे उत्तर दिले .

होय म्हणाऱ्यांमध्ये गवंडी, सेंट्रीग कामगार, फरशी बसवीणारे, पेंटर, नळकारागीर, वीजतंत्री, मदतनीस यांचा प्रामुख्याने समावेश आहे . तर १४ उत्तरदात्यांनी कामाचे स्वरुप हंगामी नाही म्हणजेच त्यांना बाराही महिने काम मिळते असे सांगीतले आहे .

एकूणच बांधकाम व्यवसायात हंगामी स्वरुपाचे काम असते, इतर काळात बेरोजगार राहावे लागते.

सारणी क्र . ५.६

<u>आशेगयाच्या समस्या दर्शवीणारी सारणी</u>

समस्या	होय	नाही	एकुण
शारीरिक त्रास	५० (१००%)	०० (००%)	५० (१००%)

कामावरुन घरी परतव्यावर शारीरिक त्रास होतो असे सर्वच उत्तरदात्यानी मान्य केले .

सारणी क्र . ५.७

शारारिक त्रासाचे स्वरुप दर्शवीणारी सारणी

शारारिक त्रासाचे स्वरुप	होय	नाही
डोके दुखी	०२	००
उष्णतेची समस्या	०२	००
अशक्तपणा / थकवा	४१	००
डोळयांमध्ये जळजळ	०५	००
एकूण	५० (१००%)	००

कोणत्या स्वरुपाचा शारीरिक त्रास होतो , असा प्रश्न विचारला असला प्रत्येकालाच कोणत्याना कोणत्या स्वरुपाचा शारीरिक त्रास होतो, असे सांगीतले आहे, त्यातच सर्वात जास्त उत्तरदात्यांनी अशक्तपणा किंवा थकवा जाणवतो असे सांगीतले .

सारणी क्र . ५.८

उत्तरदात्यांमधील व्यवनाधिनता दर्शवीणारी सारणी

व्यसनाची सवय	होय	नाही
तंबाखू, गुटखा , दारु, बिडी	३५ (७०%)	१५ (३०%)

तंबाखू, गुटखा, दारु, बीडी, मावा, सुपारी, सिगारेट यासारखे व्यसन केले जाते काय? असा प्रश्न विचारला असता 35 उत्तरदात्यानी होकारार्थी उत्तर दिले परंतु ज्यांनी नाही असे उत्तर दिले त्यांनी मात्र व्यसनाची सवय लपवीण्याचा प्रयत्न केला असे दिसून आले .

एकूणच बरेच बांधकाम मजूर व्यसनाच्या आहारी गेले आहेत हे स्पष्ट होते .

सारणी क्र . ५.९

स्वच्छता गृहाच्या व्यवस्थेबाबत माहीती दर्शवीणारी सारणी

स्वच्छता गृहाची व्यवस्था	होय	नाही
	०७ (१४%)	४३ (८६%)

कामाच्या ठिकाणी स्वच्छता गृहाची व्यवस्था असते काय ? या प्रश्नाचे नकारार्थी उत्तर ४३उत्तरदात्यांनी दिलेत, ज्यांनी होकारार्थी उत्तर दिलेत ते बहुतांश मजूर बांधकाम कार्य पूर्ण झाल्यानंतर कामावर जात असतात, उदा : इंटेरियर डिझायनर, पेंटर इ.

याचाच अर्थ कामाच्या ठिकाणी स्वच्छता गृहाची व्यवस्था नसते.

सारणी क्र . ५.१०

स्वच्छ व शुद्ध पाण्याच्या उपलब्धतेबाबत माहीती दर्शवीणारी सारणी

समस्या	होय	नाही
स्वच्छ व शुद्धपाणी	१० (२०%)	४० (८०%)

कामाच्या ठिकाणी स्वच्छ व शुद्ध पाण्याची उपलब्धता असते काय ? असा प्रश्न विचारला असता, ८० % उत्तरदात्यांनी नाही असे उत्तर दिले.

सारणी क्र . ५.११

शासकीय योजनांबद्दलची असलेली माहीती दर्शवीणारी सारणी

समस्या	होय	नाही
शासकीय योजनांबदलची माहीती	१२ (७६%)	३८ (२४%)

बांधकाम कामगारांच्या सामाजिक व आर्थिक सुरक्षिततेसाठी शासनाने अनेक कामगार कल्याण योजना सुरू केल्या आहेत . परंतु त्यातील केवळ 12 मजुरांना शासकीय योजनांची माहिती आहे आणि ते ही सरकारच्या बांधकाम कार्यालयात नोंदणीकृत आहेत , इतरांना मात्र शासकीय योजनांविषयी माहिती नाही .

सारणी क्र . ५.१२

कामगार नोंदणीबाबत माहिती दर्शवीणारी सारणी

समस्या	होय	नाही
कामगार नोंदणी	३७ (७४%)	१३ (२६%)

वरील सारणीवरुन स्पष्ट होते की , एकूण उत्तरदात्यांपैकी 37 लोकांनी कामगार नोंदणी केलेली आहे . वर्तमान काळात ऑनलाईन कार्यामुळे असणे प्रसारमाध्यमांमुळे कामगारांमध्ये जागृकता निर्माण झाली आहे , परिणामी कामगार नोंदणीत वाढ घडून येत आहे .

सारणी क्र ५.१३

ज्यादा श्रमताताबद्दलांची माहिती दर्शवीणारी

समस्या	होय	नाही
ज्यादा - श्रमतास	३२ (६४%)	१८ (३६%)

वरील माहितीवरुन लक्षात येते की 32 कामगारांनी ज्यादा श्रमतास करुन घेतले जाते . असे तांगीतले आहे . विशेषन : गवंडी, मदतनीस, फरशी बसवीणारे , मदतनीस , सेंट्रींग कामगार , इंटेरियर डिझायनर कामगार , पेंटर यांच्याकडून ज्यादा श्रमतास करुन घेतले जाते , सोबतच या ज्यादा श्रमतासा बद्दल कोणत्याही प्रकारचा ज्यादा मोबदला दिला जात नाही .

सारणी क्र . ५.१३

विश्रांतीचा काळ दर्शवीणारी सारणी

समस्या	होय	नाही
विश्रांतीचा पुरेसा काळ	१२ (२४%)	३८ (७६%)

दिवसाला शारीरिक श्रम करीत असताना विश्रांतीला पुरेसा वेळ दिला जातो काय ? याबद्दल प्रश्न विचाला असता 38 कामगारांनी म्हणजेच 76% कामगारांनी विश्रांतीसाठी पुरेसा वेळ दिल जात नाही असे सांगीतले .

सारणी क्र . ५.१५

वेतनाबाबत माहिती दर्शवीणारी सारणी

समस्या	होय	नाही
पुरेसे वेतन	१२ (२४%)	३८ (७६%)

मिळणारे वेतन कौटुंबिक गरजा पुर्ण करण्याकरीता पुरेसे आहेत काय? असा प्रश्न विचारला असता 76% उत्तरदात्यांची मिळणारे वेतन पुरेसे नसल्याबाबत उत्तरे दिलीत याचाच अर्थ मिळणाऱ्या उत्पन्नातून कोटुंबिक गरजा पुर्ण होत नाही, असे मत मांडले .

सारणी क्र . ५.१६

कर्जबाजारीपणाची माहीती दर्शवीणारी सारणी

समस्या	होय	नाही
कर्जबाजारीपणा	४० (८०%)	१० (२०%)

मिळणाऱ्या मजुरीतून कौटुंबिक गरजा पूर्ण होत नसल्यामुळे कर्ज घेण्याची वेळ येते का ? असा प्रश्न विचारला असता लग्न समारंभ, सण, आजारपणा, मुलांचे शिक्षण इ. कार्यासाठी कर्ज घ्यावे लागते.

सारणी क्र . ५.१७

कोरोना काळातील सरकारी मदतीबाबत माहिती दर्शवीणारी सारणी

समस्या	होय	नाही
कोरोनाकाळात सरकारची आर्थिक मदत	००	५०

कोरोना काळात बांधकाम मजुरांना सरकारकडून काही आर्थिक मदत मिळाली काय? याबाबत प्रश्न विचारला असता सरकारी स्वस्त धान्य दुकानातून मिळणाऱ्या अनधान्याशिवाय दुसरी कोणतीही आर्थिक मदत सरकारकडून अजूनपर्यंत मिळाली नसल्याचे सांगण्यात आले.

सारणी क्र . ५.१८

स्वयंसेवी संस्थाकडील मिळणारी मदत दर्शवीणारी सारणी

समस्या	होय	नाही
स्वयंसेवी संस्थाकडीज मदत	३३ (६६%)	१७ (३४%)

कोरोनाकाळात स्वयंसेवी संस्थाकडून काही मदत मिळाल्याबाबत विचारले असता ६६% उत्तरदात्यांनी अनधान्य व किराणा यांच्या स्वरुपात मदत मिळाल्याचे सांगीतले याचाच अर्थ स्वयंसेवी संस्थाची कोरोना काळात महत्वाची मदत मिळाल्याचे सांगण्यात आले.

प्रकरण सहावे

निष्कर्ष व उपाययोजना

आर्वी शहरातील बांधकाम मजूरांच्या समस्यांचे अध्ययन करीत असताना संशोधनाशी संबंधीत अनेक समस्यांची जाणीव झाली. संशोधनाच्या उद्दीष्ट पुर्तीकरीता अध्ययन क्षेत्रातील उत्तदात्यांकडून माहीतीचे संकलन करण्यात आले. संकलीत माहीतीचे सारणीयन करण्यात आले, यावरुन विश्लेषण करुन जे निष्कर्ष निघालेत ते प्रस्तुत प्रकरणामध्ये मांडण्यात आले याबरोबरच समस्या व उपाययोजना सूचवीण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

प्रमुख निष्कर्ष

२६ ते ३५ आणि ३६ ते ४५ या वयोगटातील सर्वाधिक कामगार म्हणजेच ७०% आहे. पदवी घेतलेल्यांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ३२% आहे आणि एकूण कामगारांमध्ये अनुसूचीत जाती आणि अनुसूचीत जमातील कामगारांचे प्रमाण ५०% आहे . याचाच अर्थ वयाचा विचार करता ४५ वयापर्यातचे काम करणाऱ्यांची प्रमाण सर्वाधिक आहे आणि पदवी पर्यतचे शिक्षण घेवून सुद्धा अशाप्रकारचे शारीरिक कष्ट करणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. सोबतच अनुसूचीत जाती जमातीचे प्रमाण अधिक आहे, त्यामुळे निश्चितच या तळाच्या स्तरापर्यत सरकारी प्रयत्न व्हायाला पाहीजेत. आरक्षणाचा खरा लाभ या तळागाळातील लोकांपर्यत पोहचायाला पाहीजेत

बांधकाम मजुरांना मिळणाचा कामाचे स्वरुप हे हंगामी स्वरुपाचे असलेले दिसून येते. पावसाळी हंगामात इमारत व रस्ते बांधकामाची क्रिया थंडावलेली असते. शिवाय उन्हाळ्यात देखील पाण्याच्या कमतरतेमुळे काही भागात बांधकाम मजुरांच्या मागणीत घट झालेली दिसून येते. अभ्यासासाठी निवडलेल्या कामगारांपैकी 72% कामगार या समस्येचे त्रस्त आहेत. हे सारणी क्र. 5.5 वरुन स्पष्ट होते.

बांधकाम क्षेत्रातील बहुसंख्य मजुरांना कोणत्या ना कोणत्या तरी आरोग्यविषयक समस्या भेडसावत असतात कारण त्यांच्या कामाचे स्वरुप हे असुरक्षीत असते. त्यांचे काम दगड, वीट, वाळू, सिमेंट, लोखंड, अस्वच्छ पाणी इत्यादींवर अवलंबून असते. शिवाय अनेक बांधकाम कामगार हातमोजे, बुट, हेल्मेट व सुरक्षीत घट्ट कपडे वापरताना दिसत नाहीत, त्याचा परिणाम म्हणून अनेक बांधकाम मजुरांना आरोग्य विषयक समस्यांना तोंड दयावे लागत आहे. अभ्यासाठी निवडलेल्या मजुरांपैकी डोकेदुखी, उष्णतेची समस्या, अशक्तपणा आणि डोक्यांमध्ये जळजळ यासारख्या शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. (सारणी क्र. ५.७) अशा बांधकाम मजुरांचे आरोग्य धोक्यात येते, परिणामी कार्यक्षमता घटून मिळकतीतही घट होते.

व्यसनाधिनता ही बांधकाम मजुरांमध्ये आढळून येणारी महत्वाची समस्या आहे. अभ्यासासाठी निवडलेल्य मजुरांपैकी ७०% व्यसनाची सवय आहे तर ३०% नी व्यसनाची सवय नाहीत, अशी उत्तरे दिलीत, परंतु मुलाखत अनुसूची भरुन घेताना असे आढळून आजे की , बहुसंख्य मजूर व्यसनाधिनतेच्या आहारी गेले आहेत अनेक मजूर व्यसनाची सवय लपवीण्याचा प्रयत्न करीत होते, असे दिसून आले (सारणी क्र. ५.८)

बांधकाम कामगारांच्या सामाजिक, आर्थिक सुरक्षिततेसाठी शासनाने अनेक कामगार कल्याण योजना सुरु केल्या आहेत. परंतु अभ्यासासाठी निवडलेल्या मजुरांपैकी फक्त २४% मजुरांना फक्त शासकीय योजनांची माहीती आहे . कारण ते मजूर सरकारच्या कामगार कार्यालयात बांधकाम मजूर म्हणून नोंदणीकृत आहेत. परंतु ७६% मजुरांना शासकीय योजनांची माहीती नाही किंवा यातील बरेचसे सरकारच्या कामगार कार्यालयात नोंदणीकृत नाहीत.

७६% मजुरांना वाटते की, मिळणारे वेतन अपुरे आहे तर फक्त २४% मजुरांना मिळणारे वेतन हे पुरेसे आहे असे वाटते. जागतिकीकरणाच्या युगात लोकांच्या गरजा व खर्च वेगाने वाढत असल्यामुळे अकुशल कामगारांना मिळणारे वेतन त्यांच्या गरजा भागवीण्यासाठी पुरेसे ठरत नाही.

कुशल कामगारांना अकुशल कामगारांपेक्षा अधिक वेतन मिळत असल्यामुळे ते वेतनाबाबत समाधानी आहेत. परंतु ७६% मजूर हे वेतनाबाबत असमाधानी असल्यामुळे अपुरे वेतन हे बांधकाम मजुरांची समस्या ठरते (सारणी ५.१५)

बांधकाम मजूर ज्या ठिकाणी काम करीत असतात, त्या ठिकाणी स्वच्छता गृहांचा अभाव दिसून आला. अभ्यासासाठी निवडलेल्या मजुरांपैकी ८६% मजुरांना कामाच्या ठिकाणी स्वच्छता गृहाच्या व्यवस्थेचा अभाव दिसून आला. स्त्री बांधकाम कामगारांसाठी ही बाब फारच अडचणीची ठरते.

बांधकाम मजुरांना कामाच्या ठिकाणी स्वच्छ व शुद्ध पाण्याची उपलब्धता होणे गरजेचे असते. पण अभ्यासासाठी निवडलेल्या मजुरांपैकी ८०% कामाच्या ठिकाणी स्वच्छ व शुद्ध पाण्याची उपलब्धता नसते असे उत्तर दिले. म्हणजेच बहुसंख्य कामगार स्वच्छ व शुद्ध पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहेत. परिणामी, त्यांना अनेक सर्व साधारण आजारांना सामोरे जावे लागत आहे (सारणी क्र. ५.१०)

इमारत व इतर बांधकाम कामगार रोजगार नियम व सेवाशर्ती अश्विनियम, १९९६ नुसार मजुराने दिवसाला ९ तासापेक्षा अधिक किंवा आठवडयाला ४८तासापेक्षा अधिक तास काम केले असेल तर त्याला अधिकची मजुरी मिळवीण्याचा अधिकार आहे , असा ज्यादा काम करुनही त्यांना कोणताही जास्तीचा लाभ दिला जात नाही, (सारणी क्र. ५.१३)

विश्रांतीच्या काळाबाबत देखील दिवसाला शारीरिक श्रम करीत असताना विश्रांतीला पुरेसा वेळ दिला जातो काय ? असा प्रश्न विचारला असता विश्रांतीला पुरेसा वेळ दिला जात नाही, असे उत्तर बहुसंख्य कामगारांनी दिलेत. (सारणी क्र. ५.१४)

कौटुंबिक गरजा पुर्ण करण्या इतकी पुरेशी मजुरी मिळते काय असा प्रश्न विचारला असता

७६% मजुरांनी मिळणारी मजुरी पुरेशी नाहीत, त्यामुळे कौटुंबिक गरजा पुर्ण होत नाहीत असे सांगीतले (सारणी क्र. ५.१५) याचबरोबर कर्ज घेण्याची वेळ येते का? असा प्रश्न विचारला असता लग्न समारंभ, सण, आजारणा, मुलांचे शिक्षण इ. कार्यासाठी कर्ज घ्यावे लागते, त्यामुळे ८०% मजुरांना कर्जबारीपणाची समस्या जाणवत आहे हे स्पष्ट होते. (सारणी क्र. ५.१६)

कोरोना काळात उदनिर्वाहासाठी सरकारकडून काही मदत मिळाली काय ? असा प्रश्न विचारला असता सरकारी स्वस्त धान्य दुकानातून अल्पप्रमाणात धान्य उपलब्ध करुन देण्यात आले, त्याशिवाय दुसरी कोणतीही मदत सरकारकडून झाली नाही, असे सांगण्यात आले. यासोबतच स्वयंसेवी संस्थांकडून अल्पप्रमाणात किराणामालाचा पुरवठा करण्यात आला असे बहुतांश बांधकाम मजुरांनी सांगीतले.

उपाययोजना

अनुसूचीत जाती व जमातीतील बांधकाम मजुरांचे प्रमाण एकूण मजुरांमध्ये जवळपास ५०% आहे. त्यामुळे आरक्षणाचा लाभ या प्रवर्गातील अजूनही मागासलेल्य लोकांपर्यंत पोहचवीण्यासाठी प्रयत्न करणे, मार्गदर्शन करणे

पदवीपर्यंतचे शिक्षण घेवून सुद्धा शारीरिक कष्ट करणाऱ्याचे प्रमाण अधिक आहे, त्यामुळे अशा तरुणांना मार्गदर्शन करुन सरकारी नोकरीसाठी किंवा स्वयंरोजगार किंवा सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन करणे

बांधकाम मजुरांच्या आरोग्य, सुरक्षा आणि कल्याणासाठी कामगार अधिकारी यांनी प्रत्यक्ष विविध भागातील बांधकामावरील मजुरांना भेटून नोंदणी करुन घेणे, त्यांना शासकीय योजनांची माहीती देणे, मार्गदर्शन करणे

ठेकेदार व कामगार संघटना यांनी बांधकाम मजुरांच्या कौशल्य विकासासाठी कार्यशाळांचे

आयोजन करणे.

इमारत व इतर बांधकाम मजुरांबाबतच्या कायदयाची काटेकोरपणे व योग्य अमलबजावणी करणे.

कामगार संघटनांनी कामगारांना भेटून सभासद नसलेल्या कामगारांना सभासद करून घेणे आणि सरकारी कामगार कार्यालयात नोंदणीसाठी मदत करणे.

ठेकेदाराने बांधकामाच्या ठिकाणी स्वच्छनागृहांची व स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा करणे.

बांधकाम सुरु असणाऱ्या परिसरात सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत आरोग्य शिबीर भटवीणे.

कामाचे स्वरुप हंगामी न राहता वर्षभर काम मिळेल यासाठी ठेकेदार व कामगार संघटनांनी प्रयत्न करणे.

मजुरांमधील व्यसनाधिनतेंची समस्या सोडविण्याबाबत त्यांच्यामध्ये जागृकता निर्माण करणे.

बांधकाम मजुरांच्या आर्थिक समस्या सोडविण्यासाठी त्यांना स्वस्त दराने कर्जपूरवठा करण्यासाठी बांधकाम मजूरांच्या सहकारी तत्वावर पतसंस्था निर्माण करणे.

कामगारांना पुरेशी मजुरी मिळेल यासाठी कामगार संघटनांनी पुढाकार घेणे.

कोरोना संकटकाळात सरकाराकडून कशी जास्तीतजास्त मदत सरकारकडून मिळेल यासाठी कामगार संघटनांनी प्रयत्न करणे.

कोरोनासारख्या संकटकाळात स्वयंसेवी संस्थाशी संपर्क साधून जास्तीतजास्त मदत मिळवीण्याचा प्रयत्न कामगार संघटनांनी करणे.

गृहीतकांची पडताळणी

संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधन कार्यासाठी संशोधनाची पुर्वतयारी करीत असताना मिळालेल्या माहितीच्या आणि आलेल्या अनुभवाच्या आधारे काही गृहीतकांची निश्चिती करण्यात आली होती. अशा गृहीत परिस्थितीला आधार मानून प्रत्यक्ष संशोधन कार्य करण्यात आले. संशोधनाअंती मिळालेल्या माहीतीवरुन संशोधनाची गृहीतके सिद्ध झाली की गैरसिद्ध झाली याची पडताळणी करण्यात आली.

गृहीतक - १ - बांधकाम मजुरांच्या आरोग्यविषयक समस्या आहेत.

अध्ययनाच्या दृष्टीने निश्चित करण्यात आलेले हे गृहीत संशोधनातून मिळालेल्या माहीतीच्या आधारे सिद्ध झाले आहे. कामावरुन घरी परतल्यावर डोकेदुखी, उष्णतेची समस्या, अशक्तपणा , डोळ्यांमध्ये जळजळ अशाप्रकारच्या आरोग्यविषयक समस्या मजुरांमध्ये जाणवतात (सारणी क्र . ५.७), याशिवाय व्यसनाधिनता, स्वच्छता गृहाचा अभाव, शुद्ध व स्वच्छ पाण्याचा अभाव यामुळे आरोग्यावर विपरित परिणाम होवून अनेक आरोग्यविषयक प्रश्न निर्माण होत आहेत . (सारणी क्र .५.८, ५.९, ५.१०)

गृहीतक - २ :- आर्थिक दृष्टया बांधकाम मजूर कमकुवत आहे .

हे गृहीतक सुद्धा सिद्ध झालेले आहे. बांधकाम मजुरांना मिळणारी मजुरी ही त्यांच्या कौटुंबिक गरजा पुर्ण करण्याच्या द्ष्टीने अपुरी आहे, त्यामुळे त्यांना सण, लग्न समारंभ, शिक्षण, औषधोपचार यासारख्या गोष्टीसाठी कर्ज काढावे लागते. म्हणजेच त्यांची आर्थिक स्थिती ही बेताचीच आहे, हे स्पष्ट होते. (सारणी क्र . ५.१५, ५.१६)

गृहीतक - ३ :- कोरोना काळातील लॉकडाउनमुळे त्यांची आर्थिक स्थिती खालावली आहे.

हे गृहीत सुद्धा सिद्ध झालेले आहे. कोरोनाकाळातील लॉकडाउनमुळे काम बंद असल्याने मजुरांची आर्थिक स्थिती अधिकच खालावलेली आहे. सरकारकडून अन्नधान्यां व्यतिरिक्त कोणतीही आर्थिक मदत मिळाली नाही स्वयंसेवी संस्थाकडून सुद्धा मिळालेली मदत ही अपुरी होती , त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती अधिकच खालावली (सारणी क्र . ५.१७ व ५.१८)

संदर्भसूची

प्रा. घाटोळे रा. ना. : समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पद्धती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर (2003)

डॉ. बोधनकर सुधीर, प्रा. अलोणी विवेक : सामाजिक संशोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर (2007)

डॉ. कायदे पाटील गंगाधर : संशोधन पद्धती, चैतन्य पब्लिकेशन्स , नाशिक

अरुणा सोळकी व किर्ती झंकरिय : Migrant construcation workers in the unorganized sector of surat city - A socio-economic analysis , EPRA international journal of Economic and business Review] vol - ३ , issue - १ , January २०१५

P. Sainath : Lecture on youtube.com , inequality and Agrarian Crisis in India at Pondichery University

https ://mahakamgar.maharashtra.gov.in/ images /pdf/building — and - other construcation wokers - rules - २००७

प्रा. चंद्रकात जाधव : कोल्हापुर शहरातील बांधकाम कामगारांचा एक अभ्यास अर्थसंवाद , मराठी अर्थशास्त्र परिषद त्रैमासिक जुलै - सप्टेंबर 2018 , एप्रील - जून – 2017

https://web.archive.org/web/२०११०८३०१२१११५

https://talukalokmat.com/attachment/ARV-pg१.pdf

मुलाखत अनूसूची

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आर्वी (अर्थशास्त्र विभाग)

संशोधनाचा विषय : आर्वी शहरातील बांधकाम मजुरांच्या समस्या **:** एक अध्ययन

गवंडी / सेंट्रींग - कामगार / नळकारागीर / फरशी बसविणारा / सुतार / फेब्रीकेटर / वीजतंत्री / इंटेरियर डिझायनर / पेंटर / बिगारी किंवा मदतनीस

1) बांधकाम मजूराचे नाव -

2) कामगाराची प्रकार -

3) वय - **१८ - २५, २६- ३५ , ३६ - ४५ , ४६ पेक्षा अधिक**

4) शिक्षण - **प्राथमिक , माध्यमिक , पदवी, अशिक्षित**

5) जातीचा प्रवर्ग - **ओबीसी , एसी , एसटी , एन टी व इतर**

6) कामाचे स्वरुप हंगामी आहे काय ? **होय** **नाही**

7) कामावरुन घरी परतल्यावर कोणत्या स्वरुपाचा शारीरिक त्रास होतो - **अ) अंगदुखी ब) डोकेदुखी क) थकवा / अशक्तपणा ड) डोळ्यात जळजळ**

8) सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातून आवश्यक साहित्य उपलब्ध केले जाते काय ? **होय** **नाही**

9) तंबाखू , गुटखा , दारु , बिडी- सिगारेंट इ. व्यसनाची सवय आहे काय ? **होय** **नाही**

10) मिळणारी मजुरी पुरेशी आहे काय ? **होय** **नाही**

11) दिवसाला पुरेशी विश्रांतीची वेळ दिली जाते काय ? **होय** **नाही**

12) कामाच्या ठिकाणी स्वच्छता गृहाची व्यवस्था असते काय ? **होय** **नाही**

13) कामाच्या ठिकाणी स्वच्छता गृहाची सोय असते काय ? **होय** **नाही**

14) स्वच्छ व शुद्ध पाण्याची व्यवस्था असते काय ? **होय** **नाही**

15) जादा श्रमतास करुन घेतले जाते काय ? **होय** **नाही**

16) मिळणाऱ्या मजुरीतून कौटुंबिक गरजा पुर्ण होतात काय ? **होय** **नाही**

17) आवश्यकतेनुसार कर्ज घेतले जाते काय ? **होय** **नाही**

18) कामगार नोंदणी केली काय ? **होय** **नाही**

19) विविध सरकारी योजनांविषयी माहीती आहे काय ? **होय** **नाही**

20) कोरोना काळात सरकारकडून काही मदत मिळाली काय ? **होय** **नाही**

21) कोरोना काळात स्वयंसेवी संस्थाकडून काही मदत मिळाली काय ? **होय** **नाही**

Photos

नम्र निवेदन सूचना